भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA C 887765

रजि. नं. 8665 दि. 18/9/08 रु. 500/-

श्री./श्रीमती मानद सचिव पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

राहणार पुणे ३८

हस्ते आर. नायकवडी

दि पुणे लॉयर्स कन्झ्युमर्स को-ऑप. सोसा. लि. पुणे करिता

9 SEP 2008

उप कोषागार अधिकारी कोषागार पुणे करिता

# ।। करारनामा ।

पुणे जिल्हा शिक्षण मंडळास श्री शिवाजी वीर बाजी पासलकर विद्यालय, पानशेत, ता. वेल्हे, जि. पुणे या विद्यालयाकरिता पानशेत वसाहतीनजीक कुरण खुर्द स.नं. ३६ (क्षेत्र १ हे. ९० आर) व तीन इमारती शैक्षणिक कामासाठी देणेबाबतचा करारनामा.

संदर्भ : मकृखोविमं. पत्र क्र. आ.१/वसाहत/२३५/२०००/दि. ०७/०१/२०००.

जलसंपदा विभाग
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ तर्फे,
कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे - ११.

करारनामा लिहून घेणार
(पक्षकार क्र. २)

आणि

मानद सचिव
पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे - ३८.

करारनामा लिहून देणार
(पक्षकार क्र. १)

हा करार पुणे येथे दिनांक १२/११/२००८ रोजी वरील पक्षकारांच्यामध्ये खालील अटी व शर्तीस अधिन राहून करण्यात येत आहे.

(मागील बाजूस पहावे.)

मिळकतीचे वर्णन : श्री. शिवाजी वीरबाजी पासलकर विद्यालय,
: पानशेत, ता. वेल्हे, जि. पुणे यांना पानशेत वसाहती नजीक मौजे कुरण खुर्द, स.नं. ३६ क्षेत्र १ हे. ९० आर व तीन
इमारती त्यांची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | पानशेत धरणाच्या सांडवा. |
| पश्चिमेस | : | स.नं. ३६ चा उर्वरीत भाग व मौजे वांजळवाडीची शीव. |
| दक्षिणेस | : | पानशेत धरणांचा सांडवा. |
| उत्तरेस | : | पाटबंधारे वसाहत. |

वरीलप्रमाणे मिळकत नकाशात दाखविल्याप्रमाणे (नकाशा हा कराराचा भाग समजण्यात यावा) खालील अटी व शर्तीप्रमाणे भाडेपट्ट्याने देण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची/पाटबंधारे खात्याची जागा परवाना धारक संस्थेस शैक्षणिक उद्देशाकरिता वापरण्यास दिली असून, सदर परवाना धारकांनी सदर जागेचा वापर शैक्षणिक स्वरूपाच्या योग्य व कायदेशीर कारणाकरिता करावयाचा आहे.
२. जागा वापराचा कालावधी मंजूरी दिनांकापासून ३० वर्षे राहिल. मुदत दि. ०६/०१/२०२९ पर्यंत राहिल.
३. मुदत संपताना जागेचा ताबा बिनशर्त महामंडळास/पाटबंधारे खात्यास द्यावा लागेल याबाबत परवाना धारकांच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही अथवा त्या विरूध्द न्यायालयात दाद मागता येणार नाही.
४. सदर जागा वापरापोटी पाटबंधारे विभाग/महामंडळ जो दर ठरविल त्या दरानुसार भाडे भरणा करणे परवाना धारकावर बंधनकारक राहिल. प्रत्येक वर्षाचे एकूण भाडे आगाऊ भरावे लागेल. (सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे).
५. देण्यात आलेल्या जागेपेक्षा अधिक जागेचा वापर करता येणार नाही.
६. सदरची जागा दुसऱ्या कोणासही पोटभाड्याने देता येणार नाही अथवा इतर व्यापारी वगैरे उपक्रम येथे राबविता येणार नाही. सदर जागेवर महामंडळाचा अधिकार राहिल.
७. जागा ज्या कारणासाठी देण्यात आली आहे, त्याच कारणासाठी तिचा वापर करणे बंधनकारक राहिल.
८. शासनास/महामंडळास जागेची आवश्यकता भासल्यास ती विनाअट परत करावी लागेल.
९. परवाना धारकास पाटबंधारे/ महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी यांना जागेत प्रवेश करणे, सर्व्हे करणे याबाबत अडथळा आणता येणार नाही. सदर संपादित जागा सिमांकित नसल्यामुळे जागेचा ताबा घेण्यापुर्वी परवाना धारकांस स्वःखर्चाने खात्याच्या प्रतिनिधी समक्ष (नगरभूमापन कार्यालयाकडून) सिमांकित करून घ्यावी लागेल.
१०. परवाना धारकास सदर जागेवर कराराच्या अटी व शर्तीनुसार परवानाधारक म्हणून अधिकार राहिल. अन्य कोणताही कायदेशीर अधिकार राहणार नाही. तसेच भाडेकरू म्हणून कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.
११. परवाना देणार व परवाना धारक यांच्यामध्ये कोणत्याही स्वरूपाचा वाद निर्माण झालेस तो मिटविण्याचा अधिकार पाटबंधारे विभाग/महामंडळाने नेमलेल्या मुख्य अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांस राहिल. सदर अधिकाऱ्याने घेतलेला निर्णय परवाना धारकावर बंधनकारक राहिल.
१२. शासनाच्या/महामंडळाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे पालन करावे लागेल.
१३. सदर ठिकाणी पक्के बांधकाम करता येणार नाही, तथापी तात्पुरत्या स्वरूपाचे (शेड इ.) बांधकामाचे आराखडे प्रथम मंजूर करून घ्यावे लागतील.
१४. वरीलप्रमाणे केलेल्या अटी व शर्ती पैकी एक किंवा जास्त अटींचा, शर्तीचा परवाना धारकांकडून भंग झाल्यास सदरील परवानगी रद्द होईल.
१५. सन २००० ते २००९ पर्यंतचे भाडे परवाना धारकांकडून रक्कम रू. २,२६,२७८/- (अक्षरी रू. दोन लाख सव्वीस हजार दोनशे अठ्ठयाहत्तर फक्त) चेक क्र. ६०५६६७ दि. ११/११/२००८ नुसार अदा करण्यात आलेले आहे.

वरील करारावर सर्व अटी व शर्ती मान्य आहेत म्हणून लिहून देणार यांनी वर दाखविलेल्या तारखेस सह्या केलेल्या आहेत.

**TRUE COPY**

सक्षीदार
नाव : श्री. के. बी. चौधरी,
पत्ता: स. नं. १०६, म्हातोबानगर,
कोथरुड, पुणे - ३८.

२)
नाव : श्री. विवेक अरुण चंदे,
पत्ता: [illegible]

सतिश शंकरराव उरसळ
मानद सचिव,
पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे.
करारनामा लिहून देणार (पक्षकार क्र. १)

कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे.
करारनामा लिहून घेणार (पक्षकार क्र. २)

[illegible]